यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक
नॅक मानांकित 'अ' श्रेणी
ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ, गोवर्धन
नाशिक – ४२२ २२२ (महाराष्ट्र) भारत

ज्ञानगंगा घरोघरी

Yashwantrao Chavan Maharashtra Open University, Nashik
NAAC Accredited 'A' Grade
Dnyangangotri, Near Gangapur Dam, Govardhan
Nashik - 422 222 (Maharashtra) India

संकेतस्थळ Website : •www.ycmou.ac.in •https://ycmou.digitaluniversity.ac
ई-मेल E-mail : dir_agri@ycmou.digitaluniversity.ac दूरध्वनी Telephone : (0253) 2230340

कृषि विज्ञान विद्याशाखा / School of Agricultural Sciences

धारिका: SAS-1562

दिनांक: 21-10-2024

# परिपत्रक

## नवीन कृषी शिक्षण केंद्र प्रस्ताव

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ अंतर्गत कृषी विज्ञान विद्याशाखेमार्फत माळी प्रशिक्षण प्रमाणपत्र शिक्षणक्रम, कृषी अधिष्ठान शिक्षणक्रम, फळबागा उत्पादन पदविका शिक्षणक्रम, भाजीपाला उत्पादन पदविका शिक्षणक्रम, फुलशेती व प्रांगणउद्यान पदविका शिक्षणक्रम, उद्यानविद्या पदविका शिक्षणक्रम, कृषी व्यवसाय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रम आणि कृषी पत्रकारिता पदविका शिक्षणक्रम संपूर्ण महाराष्ट्र राज्यात 65 कृषी शिक्षण केंद्रांमार्फत राबविले जातात.

महाराष्ट्रातील कृषी शिक्षण देणाऱ्या कृषी विद्यापीठ अंतर्गत मान्यताप्राप्त कृषी महाविद्यालय, उद्यानविद्या महाविद्यालय आणि कृषी व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालय चालविणाऱ्या शिक्षणसंस्था संबंधितांना कळविण्यात येते की, मुक्त विद्यापीठाचे वर उल्लेख केलेले कृषी शिक्षणक्रम आपल्या शिक्षण संस्थामध्ये सुरू करावयाचे असल्यास त्या संदर्भातील Manual for Agriculture Education Center Management, School of Agricultural Sciences, YCMOU 2023 मधील Annexure 1 : Requirements for opening of YCMOU Agriculture Education Center, Annexure 2 : Application Form for opening of YCMOU Agriculture Education Centre मधील मुद्द्यानुसार प्रस्ताव विद्यापीठात हार्ड कॉपी स्वरूपात दिनांक 25 ते 30 जानेवारी 2025 दरम्यान प्रत्यक्षरीत्या सादर करावा. प्रति अभ्यास केंद्र पडताळणी शुल्क रुपये 30,000 संबंधीत संस्थेला/ महाविद्यालयास मा. वित्त अधिकारी यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक यांच्याकडे ऑनलाइन पद्धतीने जमा करावे लागेल. त्यासाठीची लिंक केंद्र पडताळणीपूर्वी संबंधित संस्थेस / महाविद्यालयास कळविण्यात येईल.

धन्यवाद....!

21.10.2024

**(प्रा. डॉ. माधुरी सोनवणे)**
संचालक
कृषी विज्ञान विद्याशाखा

**(दिलीप भरड)**
**कुलसचिव**